**जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात क्रमांक. 01/2019 दिनांक :-02/03/2019 मधील परिशिष्ट -अ पान क्र. ८ अ. क्र. ८ मधील सुधारित शैक्षणिक अर्हता व अनुभव सुधारणा दिनांक 05/४/२०१९**

जिल्हा परिषद अकोला अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात क्रमांक. 01/2019 दिनांक 02/03/2019 अन्वये www.mahapariksha.gov.in व www.akolazp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन उक्त जाहिरातीत खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**मुळ जाहिरातीतील मजकुर**

**परिशिष्ठ-अ**

पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व परिक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| 8 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | वेतन बँड 5200 - 20200/- ग्रेड वेतन 2400/- | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्षाचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार किंवा संविधीमान्य तत्सम खालील पाठयक्रम<br>1) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या एक वर्षाचा पाठयक्रम उत्तीर्ण किंवा<br>2) आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन ( वास्तुशास्त्रीय आरेखक) किंवा<br>3) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक)<br>4) सैनिकी सेवेतील बांधकाम पर्यवेक्षकाचे अनुभव प्रमाणपत्र.<br>किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मध्ये पदविका, पदवी,पदव्यूत्तर पदवी स्थापत्य मध्ये धारण करीत असणारे उमेदवार पात्र असतील<br>परंतु ज्यांनी 1980-81 ते 1986-87 च्या दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची एक वर्षे मुदतीची पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. अशा उमेदवारांच्या बाबतीत शासकीय तंत्र शिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहून वयोमर्यादा 47 वर्षे इतकी शिथिल करता येईल. | |
| **वरील ऐवजी खालील प्रमाणे वाचावे** | | | | |
| 8 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | वेतन बँड 5200 - 20200/- ग्रेड वेतन 2400/- | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा राज्य सरकारच्या तांत्रिक शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या एक वर्षाचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार किंवा खालिल 5 पाठयक्रम<br>1) किमान स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचि एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषित केलेली अर्हता.<br>2) आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन ( वास्तुशास्त्रीय आरेखक)<br>3) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक)<br>4) आरेखक (स्थापत्य)<br>5) सैनिकी सेवेतील कन्स्ट्रक्शन सुपरवायझर अनुभवाचे प्रमाणपत्र.<br>किंवा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचि एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण ही अर्हता किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषित केलेली अर्हता स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी धारक/ पदविका धारक/पदव्यूत्तर अशी उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार देखील पात्र राहतील. | |

**Ã¼/ÂÖ/-**

**आयुष प्रसाद (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अकोला**